# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**

---

# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक ३१/०८/२०१९

## गडचिरोली पोलीस दलातर्फे पोळा सणानिमित्त बळीराजाचे कौतुक

गडचिरोली जिल्हयातील शेतकरी बांधवांकरीता गडचिरोली पोलीस दलातर्फे जिल्हाभरात माहे जुन व जुलै मध्ये “वीर बाबुराव शेडमाके कृषी मेळाव्यांचे” आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्यांना जिल्हाभरातुन प्रचंड प्रतिसाद मिळाला होता. याचाच धागा पकडत बैलपोळा सणाचे औचित्य साधत शेतकऱ्यांना प्रोत्साहन व त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याचे उद्देशाने मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा़े. यांच्या संकल्पनेतुन जिल्हाभरात “भव्य बैलपोळा व तान्हापोळा सजावट व रंगरंगोटी स्पर्धा” आयोजित करण्यात आली. सदर स्पर्धेचे पोळा व तान्हा पोळा या दोन्ही दिवशी स्वतंत्रपणे आयोजन करण्यात आले.

सदर स्पर्धा गडचिरोली, कुरखेडा, धानोरा, पेंढरी, अहेरी, एटापल्ली, भामरागड, जिमलगट्टा, हेडरी तसेच सिरोंचा अशा १० उपविभागीय स्तरावर पार पडली. जिल्हयातील मौजा धोडराज, मौजा ताडगाव, मौजा नारगुंडा मौजा कटेझरी, मौजा ग्यारापत्ती यांसह दुर्गम व अतिदुर्गम भागातील ४ ते ५ हजार शेतकऱ्यांनी सदर स्पर्धेत उत्स्फुर्तपणे व हिरहिरीने सहभाग नोंदविला. उत्कृष्ठ सजावट व रंगरंगोटी असलेल्या बैलजोडी व सजवलेल्या लाकडी बैलाच्या मालकांस स्वतंत्रपणे ३०००/- रु. रोख, व्दितीय क्रमांकास २०००/- रु. रोख व तृतीय क्रमांकास १०००/- रु. रोख पारितोषिक प्रत्येक उपविभागीय स्तरावर देण्यात आले.

गडचिरोली पोलीस दलाच्या या नाविण्यपुर्ण उपक्रमामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे आनंदाचे वातावरण निर्माण झाले. पोळा सणानिमीत्ताने शेतकऱ्यांचे व शेतकऱ्यांनी जिवापाड जपलेल्या बैलजोडीचा सन्मान प्रथमच करण्यात आल्यामुळे शेतकऱ्यांनी गडचिरोली पोलीस दलाच्या उपक्रमाचे कौतुक करत आभार मानले आहेत.

सदर स्पर्धेत सहभागी शेतकऱ्यांचे मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा़े. यांनी आभार मानले असुन विजयी स्पर्धकांचे अभिनंदन केले आहे. पोळा व तान्हापोळा निमीत्ताने जिल्हयातील सर्व शेतकरी बांधवांना शुभेच्छा दिल्या आहेत.